वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार
ता.वसई, जि.पालघर

इसारा रक्कम - १००००/-

जा.क्र.वविशम/भांडार/६७५/२०२३
दिनांक :०४/०९/२०२३

## जाहिर दरपत्रक

याद्वारे पुरवठादार,संस्था व व्यक्ती यांचे माहितीसाठी कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेस खालील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे गणेश विसर्जन २०२३ करिता लाईफ जॅकेट इ.साहित्य पुरविण्यासाठी इच्छुक व्यक्ती, संस्था व पुरवठादार यांचेकडून दि. १२/०९/२०२३ रोजी दु.३.०० वाजेपर्यत बंद पाकिटातून दरपत्रक मागविण्यांत येत आहे.

| अ.क्रं | तपशिल | परिमाण |
|---|---|---|
| १ | **लाईफ जॅकेट (नामांकित कंपनीचे)**<br>१) Jaket Type : Unique Stowage Design Reflective Tape Front/Back Polyester Webbing Belt attached with quick release strong Buckle and clip slider webbing.<br>२) Inside Material : Water Resistance PE foam.<br>३) Foam Thikness : १०० mm (Large)<br>४) Certification : ISO/C E (European Certification) | प्रति नगाचा दर |

## अटी-शर्ती

१) पुरवठादाराने स्वत:चे लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे. दर पत्रकावर वस्तू व सेवाकर नोंदणी (GST) क्रमांक असणे बंधनकारक राहिल.
२) मालकाचे/संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावे.
३) दरपत्रकदाराने इसारा रक्कमेचा डी.डी अथवा Pay Order दरपत्रकामध्ये (लिफाफ्यामध्ये टाकू नये) न टाकता दरपत्रक आवक करतेवेळी दयावयाचा आहे.
४) दरपत्रक मुदतीतमध्ये व वेळेमध्ये भांडार विभागात आवक करणे बंधनकारक राहिल.
५) दरपत्रकास मंजूरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून करारनामा करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
६) दरपत्रकात नमुद वस्तुंचे / साहित्यांचे दर हे सादर करताना वाहतुकीसह मुळ किंमत व वस्तू व सेवाकर (GST) वेगवेगळे दर्शविण्यात यावेत.
७) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा.उपायुक्त (भांडार) यांना राहिल.
८) वरिल अटीचे पालन जे पुरवठादार करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यांत येतील.
९) यासंबंधी दरपत्रके स्वत:चे लेटरपॅडवर बंद पाकिटातून दिनांक १२/०९/२०२३ रोजी दु.३.००वाजता मुख्य कार्यालय, विरार येथे सादर करावीत.

मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक १२/०९/२०२३ रोजी संध्या.३.१५ वाजता मा.उप-आयुक्त (भांडार) यांचे दालनात उपस्थित दरपत्रकदार अथवा त्यांचे प्रतिनिधी हयांचे समक्ष उघडण्यात येतील.

**(मा.श्री.आयुक्त साहेब यांच्या मंजूरीने)**

स्थळ :- मुख्य कार्यालय,विरार
दिनांक :- ०४/०९/२०२३

सदर दरपत्रक महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे.
(वरिष्ठ लिपीक भांडार)

उप आयुक्त(भांडार)
वसई-विरार शहर महानगरपालिका